|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव-४२५००१

KAVAYITRI BAHINABAI CHAUDHARI NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON-425001

**(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव)**

==========================================================

जा.क्र.कबचौउमवि/१७/क्रीडा/ **५९** /२०२३ दि. १०/०५/२०२३

प्रति,

**१) मा.प्राचार्य/संचालक विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था**

**२) मा. संचालक, विभाग प्रमुख विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग**

**विषय :- विद्यापीठ अध्यादेश १६३ नुसार शै.वर्ष २०२२-२३ मध्ये आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडूंना गुणलाभ देणे बाबत..**

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विविध ठिकाणी झालेल्या आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेत सहभागी खेळाडूंना सुधारीत अध्यादेश १६३ नुसार ५ गुण देण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने अशा खेळाडूंच्या गुणयाद्या तयार कराव्यात. तयार केलेल्या गुणयाद्या ई-पध्दतीने सादर करण्याची कार्यपध्दती खालील प्रमाणे वापरावी.

१) विद्यापीठ अध्यादेश १६३ तरतुदीनुसार आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेत सहभागी पात्र खेळाडूंच्या गुणयाद्या त्रुटींचे निराकरण झाल्यानंतर MKCL ने विकसित केलेला **Assement Data Entry Sofware (ADES)** द्वारे प्रोत्साहनपर ५ गुणांची नोंदणी करावयाची आहे.

२) अर्ज व विद्याशाखानिहाय याद्या सादर करतांना त्यावर संपूर्ण माहिती, विद्यार्थ्यांचा कायम नोंदणी क्रमांक **(P.R.Number)** आणि परीक्षेसाठी विद्यापीठाने दिलेला बैठक क्रमांक **(Seat Number)** तसेच त्यावर मा.प्राचार्य/संचालक तसेच शा.शि. संचालक यांच्या स्वाक्षऱ्या. अर्जासोबत संबंधित विद्यार्थ्यांचा माहे मे/जून/जुलै-२०२३ मध्ये होणाऱ्या परीक्षेचे प्रवेशपत्राची **(Hall Ticket)** सत्यप्रत जोडणे आवश्यक आहेत.

३) सदर अर्ज शा.शि. संचालकांकडून पडताळणी करुन मा. प्राचार्यांच्या शिफारसीसह क्रीडा विभागाकडे **दि. १९ मे,२०२३** पर्यंत जमा करावेत. विलंबाने प्राप्त होणारे अर्ज स्वीकृत केले जाणार नाहीत.

४) विद्यापीठ अध्यादेश १६३ मधील तरतुदीनुसार **Assement Data Entry Sofware (ADES)** द्वारे तयार झालेल्या गुणयाद्या व सोबतच्या नमुन्यातील हमीपत्र महाविद्यालय लॉगिन मध्ये **Assement Data Entry-->> Report >> Marks List** या **Link** द्वारे तयार कराव्यात.

५) **Software** द्वारे तयार केलेल्या गुणयाद्या प्रिंट अचुक असल्याची खात्री संबंधित शा.शि. संचालकांनी करावी. काही दुरुस्त्याअसल्यास अश्या दुरुस्त्या **Software** मध्ये घेण्यात याव्यात. त्याची **Correction List Print** घेऊन त्यावर शा.शि. संचालक,मा.प्राचार्य/संचालक यांनी सदर **Software Print** प्रमाणित करुन स्वाक्षरी करावी. तसेच **Submit Data** विद्यापीठाच्या **link** वर **click** करुन **data** विद्यापीठास **online submit** करावा. तसेच **hard copy** दि. **१९/०५/२०२३ ते २५/०५/२०२३** या दरम्यान सादर करावी.
दि. १२/०५/२०२३ पासून **online** सादर करावयाची **link** सुरु करण्यात येईल व दि. २०/०५/२०२३ रोजी **online** सादर करावयाची link बंद करण्यात येईल.

६) विद्यापीठ अध्यादेश १६३ मधील तरतुदीनुसार **Assement Data Entry Sofware (ADES)** गुणयाद्या तयार करतांना एखाद्या विद्यार्थ्यांचा **P.R.No., Seat No**. उपलब्ध होत नसेल त्यांनी खालील नमुन्यात प्रोत्साहनपर गुणयादी तयार करुन विद्यापीठात पत्रकात नमूद कालावधीत ई-पध्दतीने पाठवावी.

| Sr. No. | Name of the Student | Class | PRN No. | Seat No. | Sports Event Name | Marks 05 |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

कृपया,पत्रकातील निर्देशाप्रमाणे कार्यवाही करुन **Assement Data Entry Sofware (ADES)** द्वारे किंवा तक्त्यातील गुणयाद्या हया विद्याशाखा, वर्गनिहाय, याद्या नमूद कालावधीत, नमुद ई-मेलवर दि**. १९/०५/२०२३** पर्यंत पाठवावेत. त्यांची हार्डकॉपी दि. **१९/०५/२०२३** पर्यंत कार्यालयीन वेळेत विद्यापीठाच्या क्रीडा विभागात सादर कराव्यात.

कळावे-धन्यवाद !

**टीप:-१) खेळाडू एका पेक्षा जास्त क्रीडा प्रकारात सहभागी झालेला असेल तर एकाच ठिकाणी नाव पाठवावे तसेच खेळाडू आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेले असतील अशा खेळाडूंचा या प्रस्तावात समावेश करु नये. त्यांचा स्वतंत्र प्रस्ताव पाठवावा.**

आपला विश्वासू,

(डॉ. दिनेश पाटील)
**क्रीडा संचालक**

**टिप** :-

**१)** प्रोत्साहनपर गुणयाद्या **Assement Data Entry Sofware (ADES)** मध्ये तयार करतांना अडचण निर्माण झाल्यास विद्यापीठाच्या ई-सुविधा **(MKCL)** कक्ष दुरध्वनी क्र. **०२५७-२२५८४१८** वर कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

**२) Assement Data Entry Sofware (ADES)** तयार केलेल्या गुणयाद्या प्रमाणीत करुन शक्य तितक्या लवकरात लवकर सादर कराव्यात. जेणेकरुन पुढील कार्यवाही करीता सदर गुणयाद्या परीक्षा विभागाकडे वर्ग करता येतील.

**प्रत**:-

१) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव
२) विभाग प्रमुख,कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
३) विभाग प्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
४) विभाग प्रमुख, कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
५) जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
६) पध्दती विश्लेषक, संगणक केंद्र, संगणक शास्त्र विभाग, कबचौउमवि, जळगाव
७) समन्वयक, ई-सुविधा **(MKCL)** कक्ष, कबचौउमवि, जळगाव

Post Box No.80, Umavi Nagar, Jalgaon (M.S) Tel.No.0257-2020068, Fax No- 0257-2258406
Mobile – 94227761116, 9421431351 E-Mail - dapatil@nmu.ac.in, dapnmusports@rediffmail.com